सन २००४ मध्ये होणाऱ्या विधानसभा निवडणूका
शांततेत पार पाडण्यासाठी हेलिकॉप्टर सेवा उपलब्ध
करुन देण्याबाबत.

**शासन निर्णय**
**गृह विभाग**

शासन निर्णय क्र.जीईएल १००४/सीआर-२४२/विशा-१अ,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२, दिनांक: ७ ऑक्टोबर, २००४.

**वाचा:** १) शासन निर्णय क्र. विसनि ०५०४/प्र.क्र.१११/विशा-१अ,दि.१९जुलै, २००४
२) अपर पोलीस महासंचालक (का.व सु.), महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे
अ.शा.पत्र क्र.पोमसं/२१/१३/२०९१/हेलिकॉप्टर/०४, दि.४.१०.२००४.

**शासन निर्णय:**

सन २००४ मध्ये होणा-या विधानसभेच्या निवडणूकांच्या वेळी कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी होणाऱ्या खर्चासाठी एकूण रु. २८,००,००,०००/-(रुपये अठ्ठावीस कोटी मात्र) च्या अतिरिक्त अनुदानाला महाराष्ट्र (द्वितीय पुरवणी) विनियोजन अधिनियम-२००४ अन्वये मंजूरी दिल्यानुसार शासन निर्णय शासन निर्णय क्र. विसनि ०५०४/प्र.क्र.१११/विशा-१अ,दिनांक १९ जुलै, २००४ अन्वये मंजूरी देण्यात आली आहे.

२. निवडणूकीच्या कालावधीत गडचिरोली, चंद्रपूर, भंडारा, गोंदीया या नक्षलग्रस्त जिल्हयात जंगल व्याप्त डोंगराळ दुर्गम भागात मतदान अधिका-यांना त्वरीत संरक्षण देण्यासाठी तसेच मतदान केंद्रावर सुरक्षा कर्तव्यार्थ नेमण्यात आलेल्या [illegible] [illegible] [illegible], पेट्रोलिंग करण्यासाठी, आपत्कालीन मदतीकरिता भारत सरकारच्या संरक्षण मंत्रालयाचे हेलिकॉप्टर्स दि.११.१०.२००४ ते १४.१०.२००४ या कालावधीसाठी विशेष पोलीस महानिरीक्षक, नागपूर परिक्षेत्र, नागपूर यांना उपलब्ध करुन देण्यात मंजूरी देण्यात येत आहे.

३. यासाठी होणारा खर्च शासन निर्णय गृह विभाग क्र.विसनी ०५०४/प्र.क्र.१११/विशा-१अ, दि.१९ जुलै, २००४ अन्वये मंजूर केलेल्या अनुदानातून करण्यात यावा.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

विजय बागवे

( विजय बागवे )
कार्यासन अधिकारी,गृह विभाग,(विशेष), महाराष्ट्र शासन

प्रत, माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी
प्रधान महालेखापाल-१( लेखा परीक्षा/लेखा व अनुज्ञेयता)महाराष्ट्र,मुंबई.
महालेखापाल-२(लेखा परीक्षा/लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र,नागपूर.
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
निवासी लेखा परीक्षा अधिकारी,मुंबई.
पोलीस महासंचालक,महाराष्ट्र राज्य,मुंबई.
विभागीय आयुक्त, नागपूर
विशेष पोलीस महानिरीक्षक, नागपूर परिक्षेत्र, नागपूर
पोलीस अधिक्षक, गडचिरोली
वित्त विभाग,व्यय-७/अर्थ-१०/अर्थोपाय, मंत्रालय,मुंबई.
अवर सचिव (वीपुडी-१),गृह विभाग,मंत्रालय,मुंबई.
निवड नस्ती (विशा-१अ).